| |
|---|
| नि.फौ.ख.क्र.३२७४/२०२२ |
| सरकार वि. मो. जाकीर कुरेशी वगैरे |
| निशाणी क्र.२९ |

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. १ यांची शपथेवर सरतपासणी सुरू</u>**

| मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की, | | |
|---|---|---|
| नाव | – | मो. साजीद शफी कुरैशी |
| वय | – | ३४ वर्षे |
| धंदा | – | खाजगी |
| राहणार | – | मोहन नगर, टेंट लाईन, नागपूर |

**<u>सरतपास सरकार पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती संगीता गोगे यांच्याकडून</u>**

**१.** दिनांक २६.०४.२०२२ रोजी घटना घडली. घटना माझ्या घरी घर क्रमांक ४७०, सिदधार्थ टेलरच्या घराजवळ, गडडीगोदाम, नागपूर येथे घडली. दिनांक २१.०४.२०२२ रोजी माझी पत्नी आरोपी क्र.३ झेबा अमन साजीद कुरैशी ही तीचे सगळे सामान घेवुन माहेरी निघुन गेली. दोन सिलींग फॅन घरात लावलेले होते. दिनांक २६.०४.२०२२ रोजी ती दोन सिलींग फॅन घेण्याकरीता आरोपी क्र. १,२ आणि ४ सोबत घरी ४ वाजता आली. त्यांनी एक सिलींग फॅन काढला. दुसरा सिलींग फॅन काढत होते त्यावेळी मी घरी आलो. त्यावेळी आरोपी क्र.१ ने हातोडीने मला मारण्याचा प्रयत्न केला पण मला हातोडी लागली नाही. परंतु त्याने मला हातबुक्कीने नाकावर मारले. माझ्या नाकातुन रक्त वाहु लागले. आरोपी क्र.४ हीने मला स्टीलच्या डब्याने पाठीवर मारले. त्यानंतर आरोपी क्र.२ ने मला लोखंडी पाईपने मारण्याचा प्रयत्न केला पण मी वाचलो. त्यानंतर आरोपी क्र.१ ते ४ माझ्या मागे धावले. मी माझा जीव वाचवुन तेथुन पळुन गेलो. आरोपी क्र.१ ते ४ माझ्या आईवडीलांच्या घरी गेले. माझ्या म्हाता–या आईवडीलांना आरोपी क्र.१ ते ४ यांनी "मादरचोद, बहनचोद " अशी अश्लील शिवीगाळ केली. आरोपी क्र.२ ने लोखंडी पाईपने माझी कार क्रमांक एम एच ४० केआर १५४९ ची काच तोडली आणि आमचे साधारण रु.७००० ते रु.८००० चे नुकसान केले. त्यामुळे मी सदर पोलीस स्टेशन येथे जावुन आरोपी क्र.१ ते ४ विरुध्द फिर्याद दाखल केली. साक्षीदारास फिर्याद आणि प्रथम खबर अहवाल दाखवला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर फिर्याद आणि प्रथम खबर अहवाल नि.क्र. ३० आणि ३१ वर दाखल आहे. सदर

पोलीस स्टेशन च्या पोलीस अधिका–यांनी मला उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे पाठवले. माझे नाकाचे हाड तुटले होते. आज आरोपी क्र.१ ते ४ न्यायालयात हजर आहेत. त्यांना मी ओळखले. मला ज्या लोखंडी पाईपने मारले तो दाखवल्यास मी ओळखु शकेन.

**सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत                                                  माझे समक्ष,

नागपूर                                                  (श्रीमती. एस.टी. दंडे)
दिनांकः–१०.०१.२०२४                                    मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर

**साक्षीदार मो. साजीद शफी कुरैशी याचा पुढील सरतपास शपथेवर सुरु**

**२.** साक्षीदारास जीपी नं.२/२४ लोखंडी पाईप दाखवला. याच लोखंडी पाईपने आरोपींनी मला मारण्याचा प्रयत्न केला होता आणि गाडीचा काच फोडला होता. सदर लोखंडी पाईप **आर्टीकल अ** वर दाखल आहे.

**आरोपींच्या वकीलांनी नि.क्र. ३४ वर दिलेल्या अर्जावरुन साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत                                                  माझे समक्ष,

नागपूर                                                  (श्रीमती. एस.टी. दंडे)
दिनांकः–०३.०२.२०२४                                    मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर

**साक्षीदार क्र.१ मो. साजीद शफी कुरैशी यांचा पुढील उलटतपास शपथेवर सुरु**

**३.** माझ्याविरुध्द किती केसेस चालु आहेत याची मला माहीती नाही. चंद्रपुर येथे माझ्याविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४२० अन्वये केस चालु आहे याबाबत मला माहीती नाही. मी मोहसीन दाऊद कुरेशी आणि रिषभ मनोज सोनी यांना ओळखत नाही. साक्षीदारास एफआयआर क्रमांक ४९८/२०२१ दाखवली. सदर

एफआयआर माझ्याविरुध्द दाखल केलेली आहे. सदर एफआयआर **<u>नि.क्र.३८</u>** वर दाखल आहे. साक्षीदारास एफआयआर क्रमांक १६०/२०२२ दाखवली. सदर एफआयआर माझ्याविरुध्द दाखल केलेली आहे. सदर एफआयआर **<u>नि.क्र.३९</u>** वर दाखल आहे. माझ्याविरुध्द एफआयआर क्रमांक २८३/२०२२ पोलीस स्टेशन सदर भारतीय दंड विधान ४९८–ए अन्वये केस दाखल आहे याबाबत मला माहीती नाही. सदर एफआयआर **<u>नि.क्र. ४०</u>** वर दाखल आहे. हे म्हणने खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

४. हे म्हणने खरे नाही की, दिनांक २६.०४.२०२२ रोजी मला आरोपींनी मारहाण केली हे मी खोटे सांगतो आहे. माझे माझ्या पत्नीसोबत २ वर्षापासुन भांडण चालु आहे. हे म्हणने खरे नाही की, दोन वर्षापासुन मी माझ्या पत्नीला भेटलो नाही. मी माझ्या पत्नीला दिनांक २६.०४.२०२२ रोजी शेवटचा भेटलो होतो. दिनांक २६.०४.२०२२ पर्यंत आम्ही एकत्र राहत होतो.

५. आरोपी क्र.४ हीने मला स्टीलच्या डब्याने 'पाठीवर' मारले हे माझ्या जबाबात नमुद नाही. पोलीसांनी माझे कपडे जप्त केले किंवा नाही याबाबत मला माहीती नाही. हे म्हणने खरे नाही की, आरोपींनी मला मारले नाही म्हणुन मला काही माहीत नाही. दिनांक २६.०४.२०२२ रोजी माझ्याकडे मोबाईल होता. मी पोलीसांना फोन करुन दुपारी अंदाजे ३.३० वाजता घटनेबाबत सांगितले होते. मी कोणतेही काम करत नाही. दिनांक २६.०४.२०२२ रोजी मी दुपारी ३.४० वाजता घरी आलो.

६. मी दुपारी ४.०० वाजता पोलीस स्टेशनला गेलो. मेडीकल झाल्यानंतर मी घरी परत आलो. मी संध्याकाळी ६.३० वाजता रिपोर्ट दिली. संध्याकाळी ७.३० वाजता मी घरी गेलो. मी रात्री ११.४५ पर्यंत पोलीस स्टेशनला थांबलो असे घडले नाही.

७. मी डॉक्टरांना मला कोणी मारले याबाबत माहीती दिली नाही. हे म्हणने खरे नाही की, मला कोणीही मारले नाही म्हणुन मी डॉक्टरांना माहीती दिली नाही. हे म्हणने खरे नाही की, माझ्या पत्नीने माझ्याविरुध्द केस केली म्हणुन मी खोटी कहाणी करुन खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणने खरे नाही की, आरोपी दोन सिलींग फॅन घेण्याकरीता घरी आली आणि त्यांनी मला मारण्याचा प्रयत्न केला आणि मला मारहाण केली, शिवीगाळ केली, गाडीची काच फोडली आणि माझे ७००० – ८००० रुपयांचे नुकसान केले हे मी खोटे सांगतो आहे. साक्षीदारास आर्टीकल अ दाखवला. हे म्हणने खरे आहे की, असा पाईप बाजारात मिळतो. हे म्हणने खरे नाही की, आर्टीकल अ

लोखंडी पाईपने आरोपींनी मला मारण्याचा प्रयत्न केला आणि गाडीचा काच फोडला हे मी खोटे सांगत आहे. मी गाडीचा इंशुरंस क्लेम केला होता किंवा नाही हे मला माहीत नाही. मी अमरावती कोर्टात पोटगीचे पैसे भरले आहेत. हे म्हणने खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत                                        माझे समक्ष,

नागपूर                                        (श्रीमती. एस.टी. दंडे)
दिनांकः–२२.०२.२०२४                                        मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर